तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.

क्रमांक : २/एनजीपी [मॅनेजमेंट]/१०९४/3920

दिनांक : 30 JUL 1994

प्रति,

प्राचार्य,
मराठवाडा मित्रमंडळाचे
इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट एज्यूकेशन
रिसर्च अँण्ड ट्रेनिंग, पुणे.

विषय: राज्यातील खाजगी संस्थांना कायम विनाअनुदान तत्वावर विद्यपिठ कायदा कलम ४३ [४] अन्वये अनुमती देण्याबाबत...

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद पत्र क्रमांक: एफ- २७-५६/बी-२/बीओएस [एम]/९३/१९१०६, दिनांक २८.३.९४

उपरोक्त विषयाचे संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाचे पत्र क्रमांक: एनजीसी ३५९४/एमबीए ७४९७/मशि-३, दिनांक १५ जुलै, १९९४ अन्वये आपल्या संस्थेला खालील दिल्याप्रमाणे अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी काही अटींच्या व शर्तींच्या अधिन राहून दिलेली आहे.

| परवानगी दिलेले अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|
| १] एम. बी. ए. | ६० | पुणे | १९९४-९५ व |
| २] एम. पी. एम. | ३० | | १९९५-९६ |
| ३] एम. सी. एम. | ३० | | |

सदर अटींपैकी एक अट अशी आहे की, संस्थेने संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण यांचे संयुक्त खात्यात नियतठेव म्हणून रुपये दोन लक्ष जमा करणे आवश्यक आहे. व सदर नियतठेवीची मूळ पावती या संचालनालयाकडे जमा करणे आवश्यक आहे.

IMERT PUNE
Director
M.M.'s Institute Of
Management Education Research & Training
Pune - 411 052

-२/-

सदर नियतठेवीची मूळ पावती या संचालनालयाकडे जमा केल्याखेरीज आपणास मॅनेजमेंट अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतची अंतिम मान्यता देता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

[ ओ. एस. बिहाडे ]
उपसंचालक, तंत्रशिक्षण, म. रा. मुंबई.

प्रत माहितीसाठी सादर.

१] सचिव, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग , मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सादर.

M.M.'s Institute Of Management Education Research & Training IMERT PUNE

Director
M.M.'s Institute Of
Management Education Research & Training
Pune - 411 052

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :- २/एनजीसी/नियतठेव/२०१०/१८८५
दिनांक : 30 SEP 2010

प्रति,
संचालक,
मराठवाडा मित्र मंडळाचे
इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट
एज्युकेश रिसर्च अॅण्ड ट्रेनिंग,
३०२/ए, डेक्कन जिमखाना,
गोखले इन्स्टिटयूट जवळ,
पुणे

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्त्वावर खालील अभ्यासक्रम सुरु करण्यास/सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.**

संदर्भ : शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१०/(१८८/२०१०)/तांशि -४, दि.३० जूलै, २०१०.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे शासनाने आपणास शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून खालील अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अनु क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता | नियतठेवीची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | एमबीए | ६०-१२० | रु.१.०० लाख |

सदर शासन पत्रातील अट क्र.४ नुसार वरील अभ्यासक्रमासाठी संस्थाचालक व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात नॅशनलाईज किंवा शेड्युल बँकेत सदर अभ्यासक्रमासाठी रु. १.०० लाख नियत ठेव ५ वर्षासाठी जमा करावी. **(तसेच सदर एफ.डी.मध्ये नांवासमोर (MBA-V-10 )हा कोड नमूद करण्यात यावा.)** तसेच रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास तात्काळ सादर करावे. (सोबत हमीपत्राच्या मसुद्याची प्रत सोबत जोडली आहे.) सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी खाली नमुद केलेल्या बाबींची पुर्तता केल्याबाबतची माहिती कागदपत्रांच्या प्रतीसह या कार्यालयास सादर करावी.

१. वरील अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा-यांची माहिती खालील नमुन्यात उपरोक्त रु. १००/- च्या स्टॅंपपेपरवरील हमीपत्रात समाविष्ट करण्यांत यावी.

| अ.क्रं | कर्मचा-यांचे नांव | शैक्षणिक अर्हता | पदनाम | नियुक्तीचा दिनांक | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेचे पत्र, शासन मान्यतेची प्रत, विद्यापीठाचे मान्यता पत्र इत्यादी पत्रांच्या प्रती.

D:\modak\F.D. Letter Variation\Addl. MBA & MMS.doc

M.M's IMERT, PUNE-4
INWARD NO. 164
DATE 18-10-10

11

**Director**
M.M.'s Institute Of
Management Education Research & Training
Pune - 411 052

IMERT PUNE
M.M.'s Institute Of Management Education Research & Training

३. सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या सर्व शिक्षक कर्मचा-यांची नियुक्ती पत्रे रुजू झाल्याबाबतच्या पत्राच्या प्रती तसेच पदवी/पदव्युत्तर पदवी/पी.एच.डी.अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाची गुणपत्रिका व प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती.

४. सदर अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यांत आलेल्या पुस्तकांची यादी व त्याबाबत पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या पावत्यांचा क्रमांक, एकूण रक्कम यांची एकत्रित यादी

| अ.क्रं | पुरवठादाराचे नांव | खरेदी बिलाचा क्रमांक, दिनांक व रक्कम | पुरवठादाराला रक्कम अदा केलेल्या बिलाचा क्रमांक व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

५. सदर अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारे संगणक व त्यासंबंधीची यंत्रसामुग्री तसेच फर्निचर बाबतची संख्यानिहाय यादी व पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या पावत्याचा क्रमांक, एकूण रक्कम याची एकत्रित यादी.

| अ.क्रं | पुरवठादाराचे नांव | खरेदी बिलाचा क्रमांक, दिनांक व रक्कम | पुरवठादाराला रक्कम अदा केलेल्या बिलाचा क्रमांक व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

६. संयुक्त खात्यात नियत ठेव ठेवण्यासाठी बँकेचा फॉर्म व नमुना स्वाक्षरी फॉर्म सादर करावा.

७. सदर अभ्यासक्रमासाठी **पुणे विद्यापीठ, पुणे** यांची संलग्नता घेणे आवश्यक आहे. विद्यापीठाची संलग्नता नसल्यास सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. संलग्नता पत्राची प्रत सोबत जोडण्यात यावी. तसेच वरील सर्व कागदपत्रांवर संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांच्या सह्या असणे आवश्यक आहे.

वरील बाबींची माहिती सादर केल्यानंतरच संस्था सुरु करण्याची या संचालनालयाची अंतिम परवानगी देण्यात येईल. तसेच सदर अभ्यासक्रमाची फी निर्धारित करण्यासाठी शिक्षण शुल्क समिती वांद्रे यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

आपला

7-10-2010

( डॉ. वि.म.माहितकर )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा.कुलगुरु, **पुणे विद्यापीठ**, पुणे यांना मानार्थ सादर त्यांना विनंती करण्यांत येते की, उपरोक्त रक्कम संचालकांच्या संयुक्त खात्यात जमा केल्याची खात्री केल्याशिवाय विद्यार्थ्यांचे एनरॉलमेंट करु नये.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीसाठी.

IMERT PUNE — M.M.'s Institute Of Management Education Research & Training

**Director**
M.M.'s Institute Of
Management Education Research & Training
Pune - 411 052

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :- २/एनजीसी/नियतठेव/२०१२/१७०८

दिनांक : 3 OCT 2012

प्रति,
प्राचार्य,
मराठवाडा मित्र मंडळाचे,
इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट एज्युकेशन रिसर्च अँड ट्रेनिंग,
३०२/ए, डेक्कन जिमखाना, गोखले इन्स्टिटयुट पुणे,
जि. पुणे – ४११ ००४.

**(Institute Code 6108)**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना-अनुदान तत्त्वावर नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्र.टीईएम-२०१२/प्र.क्र.९८(भाग-१)/तांशि-४, दि. ३०.०६.२०१२.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने व शासनाने संदर्भाधिन पत्रान्वये आपणास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम खालील प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता | नियतठेवीची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | एमबीए (द्वितीय पाळी) | ६० | ४.५० लाख |

सदर अभ्यासक्रमासाठी संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात नॅशनलाईज किंवा शेडयुल बँकेत रु. ४.५० लाख नियत ठेव १० वर्षासाठी जमा करुन नियतठेवीची मूळप्रत पडताळणीसाठी या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी. (तसेच सदर एफ.डी.मध्ये नांवासमोर ("MBA-V-12) हा कोड नमूद करण्यात यावा.)

सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी/सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यासाठी खाली नमुद केलेल्या बाबीची पुर्तता करुन माहिती कागदपत्रांच्या प्रतीसहीत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

१. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेचे पत्र, शासन मान्यतेचे पत्र, विद्यापीठाचे मान्यता पत्र इत्यादी पत्रांच्या साक्षांकित प्रती.

M.M.'s IMERT, PUNE-4
INWARD NO. 092
DATE 8/11/12

Pardeshi madam
n.a.
08/11/2012

C:\Users\desk2\Desktop\FD FOR VARIATION12-13\MBA12-13.doc



Director
M.M.'s Institute Of
Management Education Research & Training
Pune - 411 052

M.M.'s Institute Of Management Education Research & Training
IMERT PUNE

२. रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोदंणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर करावे. (सोबत हमीपत्राच्या मसुद्याची प्रत जोडली आहे.)

३. हमीपत्राच्या मसुद्यात दर्शविण्यात आलेल्या विहीत तक्त्यात सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या अभ्यासक्रमासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा-यांची माहिती समाविष्ट करण्यांत यावी.

४. तसेच हमीपत्रात दर्शविण्यात आलेल्या विहित तक्त्यात सदर अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यांत आलेली पुस्तके, संगणक, यंत्रसामुग्री तसेच फर्निचर बाबतची माहिती सादर करण्यात यावी.

५. संयुक्त खात्यात नियत ठेव ठेवण्यासाठी बँकेचा नमुना स्वाक्षरी फॅार्म संस्थाचालक हयांच्या स्वाक्षरी सहीत मा. संचालकांच्या स्वाक्षरी करीता सादर करावा.

सदर अभ्यासक्रमासाठी कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांची संलग्नता घेणे आवश्यक आहे. विद्यापीठाची संलग्नता नसल्यास सदर पदवी अभ्यासक्रमाचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच वरील बाबींची पूर्तता करुन माहिती कागदपत्रासह सादर केल्यानंतरच अभ्यासक्रम सुरु करण्याची या संचालनालयाची अंतिम परवानगी देण्यात येईल.

(डॉ.वि.म.मोहितकर)
उपसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१. मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांना मानार्थ सादर त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त रक्कम संचालकांच्या संयुक्त खात्यात जमा केल्याची खात्री केल्याशिवाय विद्यार्थ्यांचे एनरॉलमेंट करु नये.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीसाठी.

M.M.'s Institute Of Management Education Research & Training
IMERT PUNE

Director
M.M.'s Institute Of
Management Education Research & Training
Pune - 411 052

महाराष्ट्र शासन
**तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५,४९२,४४२, ४४३,
ई-मेल–desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://www.dtemaharashtra.gov.in

कार्यालयीन आदेश क्र. २/एनजीसी/मान्यता/२०२५-२६/एआयसीटीई/भाग २/ ३९ दिनांक: 22 JAN 2026

विषय : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ आणि वर्किंग प्रोफेशनल अभ्यासक्रमाच्या मान्यतेबाबत......

संदर्भ : १) शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय
२) संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/मान्यता-परिपत्रक/२०२५-२६/४३६, दि.२९.५.२०२५
३) संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/डिटीई Online मान्यता-परिपत्रक/२०२५-२६ / १०२६, दि.१८.११.२०२५

शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील निर्देशास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता शिखर परिषदांच्या मान्यतेच्या आधारे शासनाने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाच्या संस्थांना कागदपत्रांची सुची देऊन कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करण्यास दिनांक २९.५.२०२५ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. तसेच संचालनालयाने दिनांक १८.११.२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार संचालनालयाच्या अंतिम मान्यतेसाठी ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर माहिती अपलोड करण्यास कळविले होते. त्यानुसार ज्या संस्थांनी अंतिम मान्यता पोर्टलवर माहिती अद्ययावत केली आहे व विभागीय कार्यालयाने त्यांची पडताळणी करुन त्यांची अंतिम मान्यतेसाठी शिफारस केली आहे अशा संस्थांची पडताळणी संचालनालय स्तरावरुन करण्यात आली. पडताळणी करुन परिपुर्ण असलेल्या सोबतच्या विवरणपत्रातील एकूण ४८ संस्थेतील नवीन अभ्यासक्रमास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमता वाढीसह या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.सदरहू संस्थांना खालील अटी बंधनकारक असतील.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसीत केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. संस्थांच्या अभ्यासक्रमांना संबंधित विद्यापीठाने संलग्नता अटी व शर्तींच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना विद्यापीठ / मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेचे आग प्रतिबंधक प्रमाणपत्र असणे व या प्रमाणपत्राचे वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी / कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद / शासन / विद्यापीठ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे सोबतच्या विवरणपत्रात अंतर्भूत संस्थांना बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी ई मेल द्वारे अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सेलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२. कुलसचिव, संबंधित विद्यापीठे (संबंधित संस्थेमार्फत)
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे
४. संबंधित संस्था
५. कार्यासन क्र.२,१० व ३, मुख्य कार्यालय, मुंबई
६. निवड नस्तीस.

संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०२५-२६/ एआयसीटीई/भाग २/3६, दिनांक 22 JAN 2026 सोबतचे विवरणपत्र

| Sr | Region | DTE Code | Institute Name | Institute Address | District | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2024-25 | Intake Approved for 2025-26 | GOV. GR No. | GOV. GR Date | Approval For |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 | Pune | 16202 | MES SENIOR COLLEGE | 131, MAYUR COLONY, KOTHRUD, | Pune | BCA | Savitribai Phule Pune University | Under Graduate | BCA | - | 60 | Manyata-2025/C.R.457/TE-4 | 27/06/2025 | Additional Course in UG,PG and PG Diploma (Engg/ Pharmacy/Architecture /HMCT/ BBA/BBM/BMS/BCA/ MBA Integrated/ MCA Integrated/ Design/MBA/MCA/PG DM/PGDBM) |
| 23 | Pune | 6108 | Marathwada Mitra Mandal's Institute of Mangement Education Research & Training, Pune | Sr.No.18, Plot No.5/3, CTS No.205, Karve Nagar, Pune. | Pune | M.B.A./M.M.S. | Savitribai Phule Pune University | Post Graduate | M. B. A. | 180 | 240 | िाासन खनणषय क्र.मान्यता-2025/प्र.क्र.380/तांखि-4 | 26/06/2025 | Increase in Intake in UG,PG,Diploma course(for one division of 60) |
| 24 | Chhatrapati Sambhjinagar | 2772 | JSPM College of Engineering, Latur | Plot No-74, Kalamb Road, Near PVR Talkies, MIDC, Latur | Latur | Bachelor of Engineering (B. E.) / Bachelor of Technology (B. Tech.) | Dr. Babasaheb Ambedkar Technological University,Lonere | Under Graduate | Artificial Intelligence and Machine Learning | - | 60 | शासन निर्णय क्र. मान्यता - 2025/प्र. क्र. 112/तांशि-4 | 19/06/2025 | New Degree Institute Engineering |
| | | | | | | Bachelor of Engineering (B. E.) / Bachelor of Technology (B. Tech.) | Dr. Babasaheb Ambedkar Technological University,Lonere | Under Graduate | Electronics and Telecommunication Engg | - | 60 | शासन निर्णय क्र. मान्यता - 2025/प्र. क्र. 112/तांशि-4 | 19/06/2025 | New Degree Institute Engineering |
| | | | | | | Bachelor of Engineering (B. E.) / Bachelor of Technology (B. Tech.) | Dr. Babasaheb Ambedkar Technological University,Lonere | Under Graduate | Computer Engineering | - | 60 | शासन निर्णय क्र. मान्यता - 2025/प्र. क्र. 112/तांशि-4 | 19/06/2025 | New Degree Institute Engineering |
| | | | | | | Bachelor of Engineering (B. E.) / Bachelor of Technology (B. Tech.) | Dr. Babasaheb Ambedkar Technological University,Lonere | Under Graduate | Civil Engineering | - | 60 | शासन निर्णय क्र. मान्यता - 2025/प्र. क्र. 112/तांशि-4 | 19/06/2025 | New Degree Institute Engineering |

OFFICE OF THE DIRECTORATE OF TECH. EDN. * M.S. MUMBAI *

(Dr.Vinod Mohitkar)
Director ,Technical Education,M.S.Mumbai